मराठी विषयाच्या अभ्यासमंडळाची चौथी बैठक, शुक्रवार, दि. १९ डिसेंबर २०१९ रोजी सकाळी ११.०० वाजता, महाविद्यालयाच्या कॉन्फरन्स रुम मध्ये (पहिला मजला) आयोजित करण्यात आली होती.

प्रस्तावित विषय:

अ. अभ्यासमंडळाच्या आधीच्या बैठकीचे कार्यवृत्त वाचून निश्चित करणे.

आ. २०१८-२०१९ या शैक्षणिक वर्षापासून नेमलेल्या नवीन अभ्यासक्रमाचा आढावा घेणे.

इ. सत्र १, ३, ५ च्या प्रश्नपत्रिकांचा आढावा घेणे.

ई. कौशल्यविकसन प्रमाणपत्र अभ्यासक्रमाची अंमलबजावणी व तो पूर्ण करणाऱ्या पहिल्या तुकडीच्या कामगिरीचा आढावा घेणे.

उ. विद्यापीठ अनुदान आयोगाद्वारे निर्धारित नमुन्यानुसार सर्वसाधारण स्नातक व मराठी भाषा आणि साहित्यतालिका यांची चर्चा व मंजुरी.

ऊ. अध्यक्षांच्या सहमतीने ऐन वेळी उपस्थित होणाऱ्या मुद्यांची चर्चा.

या बैठकीस पुढील सदस्य उपस्थित होते.

१. डॉ. स्नेहा देऊस्कर (अध्यक्ष) — स्नेहा देऊस्कर
२. डॉ. नीलांबरी कुलकर्णी — N.M. Kulkarni
३. डॉ. भारती निरगुडकर — भारती निरगुडकर
४. डॉ. रेखा इनामदार-साने — Rekha Inamdar-Sane
५. डॉ. प्रिया जामकर — प्रिया जामकर
६. श्रीम. दीपाली चौधरी — दीपाली चौधरी

या बैठकीत अभ्यासमंडळाच्या तिसऱ्या बैठकीचे इतिवृत्त वाचून सर्वानुमते निश्चित करण्यात आले.

यानंतर अध्यक्षांनी २०१८-२०१९ या शैक्षणिक वर्षात नेमल्या गेलेल्या सत्र १, ३, ५ च्या अभ्यासक्रमाचा आढावा घेतला. या अभ्यासक्रमाच्या अध्यापनामध्ये कोणत्याही अडचणी नसल्याचा निर्वाळा दिल्यामुळे तो अभ्यासक्रमच निश्चित करण्यात आला.

सत्र १,३,५ च्या २०१९ च्या प्रश्नपत्रिकांचा आढावा (वर्गचाचणी + सत्रांत परीक्षा) घेण्यात आला. या सर्व प्रश्नपत्रिका नियोजित स्वरुपान असल्याचे सदस्यांनी सांगितले.

या बैठकीत कौशल्यविकसन प्रमाणपत्र अभ्यासक्रमाची केलेली अंमलबजावणी व तो पूर्ण करणाऱ्या पहिल्या तुकडीच्या कामगिरीचा

आढावा अध्यक्षांनी घेतला. विद्यार्थ्यांनी हा 'युनिकोड-पेजमेकिंग-इन डिझाइन' विषयक अभ्यासक्रम पूर्ण केल्याचे अध्यक्षांनी सांगितले.

यानंतर विद्यापीठ अनुदान आयोगाद्वारे निर्धारित नमुन्यानुसार सर्वसाधारण स्नातक व मराठी भाषा आणि साहित्य स्नातक पदवी अभ्यासक्रमाची निष्पत्ती आणि मराठीच्या मुख्य अभ्यासपत्रिकांसंदर्भात पडताळणी तालिका यांची मांडणी डॉ. नीलांबरी कुलकर्णी यांनी केली. त्यावर चर्चा करून सदस्यांनी त्यास मंजुरी दिली.

शैक्षणिक वर्ष- २०२०-२१ मध्ये प्रथम वर्ष कला शाखेच्या मराठी अनिवार्य व मराठी ऐच्छिक-१ या विषयांचे अभ्यासक्रम बदलण्याच्या दृष्टिकोनातून या अभ्यासक्रमाचे स्वरूप काय असावे, या संदर्भातही सदस्यांनी चर्चा केली. त्या दिशेने अभ्यासक्रमाची रचना करण्याच्या दृष्टीने पुढील बैठकीमध्ये विमर्श घेण्याचे ठरले.

अध्यक्षांनी उपस्थित सदस्यांचे आभार मानले. आणि बैठक समाप्त झाली.

[signature]

डॉ. स्नेहा देऊस्कर
मराठी विभागप्रमुख व
अध्यक्ष, मराठी अभ्यासमंडळ.

[signature] 22/12/2020